आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

९ एप्रिल २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर, उद्धव ठाकरे २१, काँग्रेस १७ आणि शरद पवार १० जागांवर उमेदवार देणार

- अटकेला आव्हान देणारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली

- गुढीपाडवा आणि चैत्र नवरात्रीचा देशभर उत्साह

- अहमदनगर जिल्ह्यात बायोगॅसच्या खड्ड्यात पडून ५ जणांचा मृत्यू

**आणि**

- विदर्भ आणि मराठवाड्यातल्या अनेक जिल्ह्यात गारपीटीसह अवकाळी पावसानं पीकांचं नुकसान

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडीनं जागावाटप आज जाहीर केलं. त्यानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० मतदारंघात उमेदवार उभे करणार आहे. मुंबईत शिवालय इथं खासदार संजय राऊत यांनी संयुक्त वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

मुंबईत दक्षिण मध्य, वायव्य, दक्षिण आणि ईशान्य मुंबई अशा ४ जागांवर शिवसेना तर उत्तर आणि उत्तर मध्य अशा २ जागांवर काँग्रेस लढणार आहे. या

बरोबरच **नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापुर, रामटेक** अशा एकूण १७ जागा काँग्रेस लढणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, **शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर आणि बीड** या जागांवर लढणार आहे.

शिवसेना मुंबईच्या चार जागांबरोबरच **जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, उस्मानाबाद, रत्नागिरी, बुलडाणा, हातकणंगले, औरंगाबाद, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ वाशिम** या जागा लढवणार आहे.

सर्व घटक पक्ष एकदिलानं  लढून विजय मिळवतील, असा विश्वास यावेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शेकापचे जयंत पाटील, शिक्षक नेते कपिल पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

गेल्यावेळी राज्यात भाजपाचे २३, शिवसेनेचे १८, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ यांच्याशिवाय इम्तियाज जलील आणि नवनीत राणा खासदार म्हणून निवडून आले होते. २१ जागांवर काँग्रेस, १४ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस, ५ जागांवर शिवसेना, प्रत्येकी दोन जागांवर भाजपा, वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते. महाविकास आघाडीनं आतापर्यंत ४८ पैकी ४२ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. गेल्यावेळी खासदार निवडून आलेल्या किंवा पक्षाचा उमेदवार दुसऱ्या जागेवर असलेल्या आपापल्या बहुतांश जागा महाविकास

आघाडीतल्या पक्षांनी कायम ठेवल्या आहेत. मात्र **अमरावती, भंडारा-गोंदिया, भिवंडी, कोल्हापूर, ईशान्य मुंबई, रावेर आणि वर्धा** या ७ जागा त्याला अपवाद आहेत. **भिवंडी, रावेर आणि वर्धा** या गेल्यावेळेच्या काँग्रेस कडच्या जागा शरद पवारांच्या पक्षाला मिळाल्या आहेत. **कोल्हापूर आणि भंडारा-गोंदिया** या गेल्यावेळची शरद पवार यांच्या पक्षाची जागा काँग्रेसकडे गेली आहे. **अमरावतीची** जागा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून काँग्रेसकडे गेली आहे. ईशान्य मुंबईची जागा शरद पवार यांच्या पक्षाकडून उद्धव ठाकरे यांच्याकडे गेली असली तर संजय दिना पाटील हे उमेदवार कायम आहेत.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणूक ही केवळ निवडणूक नसून, नव्या भारताच्या उभारणीची मोहिम आहे, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज मध्य प्रदेशात बालाघाट इथं प्रचारसभेत बोलत होते.

भाजपा सरकार ‘सबका साथ सबका विकास’ हा मंत्र जपत प्रत्येक गाव आणि शहराला प्राधान्य देत आहे, देशात आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सरकार कोट्यावधी रुपये खर्च करत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपा खासदार हेमामालिनी, यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल काँग्रेस नेते रणदीपसिंग सुरजेवाला यांना निवडणूक आयोगानं नोटिस बजावली आहे. सुरजेवाला यांना येत्या गुरुवारी संध्याकाळपर्यंत यावर उत्तर द्यावं, असं या नोटिशीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

सक्तवसुली संचलनालयानं केलेल्या अटकेला आव्हान देणारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं आज फेटाळली. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही अटक झाल्याचा आरोप केजरीवाल यांनी केला होता. न्यायालयानं हे आरोप रद्द ठरवले. त्यांना अटक करण्यासाठी पुरेशी कागदपत्र, माफीच्या साक्षीदाराचा जबाब आणि गोव्याच्या निवडणुकीसाठी केजरीवाल यांनी पैसे पुरवल्याचा आप च्या उमेदवाराचा जबाब उपलब्ध असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. २१ मार्च रोजी अटक झाल्यानंतर सुरुवातीला ते ईडीच्या कोठडीत होते. सध्या केजरीवाल १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडीत आहे.

**<><><><>**

चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहानं साजरा झाला. घरोघरी गुढ्या उभारुन, मिष्टान्नाचं भोजन करुन, शोभिवंत रांगोळ्या काढून, एकमेकांना शुभेच्छा देत हा सण साजरा करण्यात आला. शालिवाहन शके

१९४६ या नवीन वर्षाची सुरुवात आजपासून झाली असून नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. चैत्र प्रतिपदेला नवीन वर्षाचं स्वागत करणारे विविध सण उत्सव आज देशभरात साजरे झाले. जम्मू काश्मीरमधे नवरेह निमित्त शरिका देवीचा उत्साह साजरा होत आहे. खीरभवानी, टिक्कर, तुलमुला या ठिकाणी देवी मंदिरांमधे भाविकांनी गर्दी केली आहे. चैत्री नवरात्राचा प्रारंभ आज होत असून देशाच्या उत्तर भागात पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमधे सणांचा उत्साह आहे.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आजही नव्या उच्चांकांना स्पर्श केला. त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दिवसअखेर सेन्सेक्स ५९ अंकांची घट नोंदवून ७४ हजार ६८४ अंकांवर आणि निफ्टी २४ अंकांची घसरण नोंदवून २२ हजार ६४३ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्यात नेवासे तालुक्यातल्या वाकडी इथं वापरात नसलेल्या आणि गोबर सोडलेल्या विहिरीत पाच जणांचा शेणाच्या दलदलीत फसून मृत्यू झाला. या विहिरीत पडलेल्या पडलेल्या मांजराला वाचवण्यासाठी सहाजण विहिरीत उतरले होते. त्यापैकी एकजण वाचला. त्याला अहमदनगर इथं रुग्णालयात दाखल केलं आहे. मात्र पाच जण या बायोगॅसच्या खड्ड्यात रुतून बसलेले असून त्यांचे मृतदेह काढण्यात अडचणी निर्माण होत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचलनालयानं १ हजार ८०७ एकर जमीन ताब्यात घेतली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या देवगड तालुक्यातल्या विजयदुर्ग गावात ही जमीन आहे. या जमीनीची अंदाजे किंमत ५२ कोटी ९० लाख रुपये आहे.

**<><><><><>**

वर्ष अखेरपर्यंत तापमानात घट झाली नाही तर अकल्पित परिस्थिती उद्भवू शकते असा इशारा नासाने दिला आहे. यंदाच्या उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत उत्तर ॲटलांटिक किंवा इतर प्रदेशांमधे तापमानात विक्रमी वाढ दिसून आली तर त्यामुळे अकल्पित परिस्थिती निर्माण होऊ शकते असं मत नासाच्या गोडार्ड इन्स्टिट्यूट फॉर स्पेस स्टडीजचे संचालक गॅव्हिन श्मिडीट यांनी दिला आहे. तापमानाशी संबंधीत माहितीअंतर्गत मार्च २०२४ हा आजवरचा सर्वाधिक उष्ण महिना म्हणून नोंद झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गॅव्हिन यांनी हे मत व्यक्त केलं. या माहितीनुसार गेल्या वर्षातील जून महिन्यापासून सलग दहा महिने, प्रत्येक महिना हा उष्णतेच्या बाबतीत नवा उच्चांक गाठणारा महिना ठरला आहे. या तापमान वाढीमागे हवामानविषयक निर्माण झालेली अल निनो ही परिस्थिती आणि मानवनिर्मित कारणांमुळे हवामान झालेले बदल कारणीभूत असल्याचंही गॅव्हिन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

**राज्यात मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी गारपीट आणि अवकाळी पावसानं पीकांचं नुकसान झालं.**

**वाशिम जिल्ह्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. बिजवई कांदा या पिकासह फळबागांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे.**

**अमरावती** तालुक्यात आज सकाळी गारांसह पाऊस पडला. यामुळे कांदा, गहू, भाजीपाला, केळी, गावरान आंबा, संत्री या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं.

**अकोल्यात** विजांच्या कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या पावसानं शेतमालाचं तसंच आंबा आणि इतर फळबागांचंही नुकसान झालं.

**हिंगोलीच्या** सेनगाव तालुक्यात काही ठिकाणी गारपीट झाली.

**लातूर** शहर आणि परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसानं अनेक ठिकाणी आंब्याच्या पिकांचं नुकसान झालं.

**परभणीत** सर्वत्र विजेचा कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे ज्वारी, हरबरा या पिकांचं, तसंच अंबा, द्राक्ष इत्यादी फळबागांचं नुकसान झालं आहे.

**नांदेड**मध्येही आज संध्याकाळी हलका पाऊस झाला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुल्लानपूर इथल्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडिअमवर पंजाब किंग्ज आणि सनराजयझर्स हैद्राबाद यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आला तेव्हा सनराजयझर्स हैद्राबादच्या ८ षटकात ३ बाद ५६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

बेल्जियमच्या परराष्ट्र मंत्री  थिओडोरा जेनट्झी यांनी आज परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांची  नवी दिल्ली इथं भेट घेतली. दोन्ही देशांदरम्यान आर्थिक आणि राजकीय सहकार्य वाढवण्याबाबत विधायक चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सेमी कंडक्टर, हिरे उद्योग आणि पर्यावरण स्नेही उद्योगांचे प्रश्न आपम उपस्थित केल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**